जा.क्र.वि.शा./निवडणूक/            /२०१८
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा कार्यालय,पुणे
दिनांक :- ३०/०१/२०१८

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८ दि.२२/०१/२०१८ च्या आदेशान्वये माहे मार्च-२०१८ ते मे-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या व नव्याने स्थापीत,सरपंच पदासह सर्व सदस्य पदासाठी तसेच रिक्त पदाच्या पोटनिवडणुकांसाठी कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला असुन त्यामध्ये पुणे जिल्हयातील ३७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व २७४ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी निवडणूका जाहीर झालेल्या आहेत. आचारसंहीता दिनांक २२/०१/२०१८ रोजी रात्रौ १२.०० वा. पासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील **१) उत्तमनगर, पोलीस स्टेशन-** सांगरुण, खडकवाडी,कोंढवे-धावडे ,मांडवी खुर्द,बहुली,जांभळी ,न्यु कोपरे, **२) सिंहगड रोड पोलीस स्टेशन-** न-हे, **३) हिंजवडी पोलीस स्टेशन-** सुस,म्हाळुंगे,माण, हिंजवडी, **४) हडपसर पोलीस स्टेशन -**शेवाळवाडी,मांजरी बु. जि. पुणे या ग्रामपंचायतींची निवडणूक होणार असून, दिनांक २५/०२/२०१८ रोजी मतदान व दिनांक २६/०२/२०१८ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी आचारसंहिता सुरु झालेपासून, मतमोजणी पुर्ण होईपर्यंत पुणे शहरात निवडणूक सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींना निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उत्तमनगर, सिंहगड रोड, हिंजवडी, हडपसर या पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात दिनांक-    /०१/२०१८ रोजी रात्रौ ००.०१ वा पासून ते दिनांक २६/०२/२०१८ चे २४.०० वा पर्यंत खालील आदेश देत आहे.

१) निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने कोणत्याही परिस्थितीत एकावेळी तीन पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे १५ मिनीटांचे असावे.
२) सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेविषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहिल व शासकीय कामावर असलेल्या वाहनांच्या संदर्भात लागू राहणार नाही.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी    /०१/२०१८  रोजी दिला आहे.

**(रविंद्र कदम)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर.**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :-    /०१/२०१८**

जा.क्र.वि.शा./राजकीय /        /२०१८
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा,कार्यालय पुणे
दिनांक :- ३०/०१/२०१८

**विषय :- महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.२/का-८ दि.२२/०१/२०१८ च्या आदेशान्वये माहे मार्च-२०१८ ते मे-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या व नव्याने स्थापीत,सरपंच पदासह सर्व सदस्य पदासाठी तसेच रिक्त पदाच्या पोटनिवडणुकांसाठी कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला असुन त्यामध्ये पुणे जिल्हयातील ३७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व २७४ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी निवडणूका जाहीर झालेल्या आहेत. आचारसंहीता दिनांक २२/०१/२०१८ रोजी रात्रौ १२.०० वा. पासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील **१) उत्तमनगर, पोलीस स्टेशन-** सांगरुण, खडकवाडी,कोंढवे-धावडे ,मांडवी खुर्द,बहुली,जांभळी ,न्यु कोपरे, **२) सिंहगड रोड पोलीस स्टेशन-** न-हे, **३) हिंजवडी पोलीस स्टेशन-** सुस,म्हाळुंगे,माण, हिंजवडी, **४) हडपसर पोलीस स्टेशन** -शेवाळवाडी,मांजरी बु. जि. पुणे या ग्रामपंचायतींची निवडणूक होणार असून, दिनांक २५/०२/२०१८ रोजी मतदान व दिनांक २६/०२/२०१८ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी, सदरची सार्वत्रिक निवडणूक ही सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे

त्याअर्थी मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे मिळालेल्या अधिकारानुसार उत्तमनगर, सिंहगड रोड, हिंजवडी, हडपसर या पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकारी यांना खालील नमूद केलेप्रमाणे लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान करीत आहे.

**अ**. रस्त्यावरून जाणा-या जमावाचे अगर मिरवणूकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत आदेश देणे.
**ब**. ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग निश्चित करणे.
**क**. सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणूकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणा-या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर नियंत्रण करणे.
**ड**. मिरवणूकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण करणे.

हा आदेश पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर, सिंहगड रोड, हिंजवडी, हडपसर या पोलीस स्टेशनचे हद्दीत दि.  /०१/२०१८ चे रात्रौ ००.०१ वा.पासून ते दिनांक २६/०२/२०१८ चे २४.०० वा.पर्यंत लागू राहील.

सदर आदेशचा भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस ॲक्ट १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक  /०१/२०१८ रोजी दिला आहे.

**(रविंद्र कदम)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर.**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :-     /०१/२०१८**